
# तिफण

MAH MAR 34737/13/1/2009-TC ISSN 2231-573X UGC Care Listed Journal
एप्रिल, मे, जून २०२०

## सुखना मायची कहाणी

शिवाजी हुसे




Printed Books / periodicals

हा अंक मालक, मुद्रक, प्रकाशक, शिवाजी हुसे यांनी स्वरूपणी ऑफसेट,सिडको, औरंगाबाद येथे छापून 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडागोंड, कन्नड, ता. कन्नड, जि. औरंगाबाद येथे प्रसिद्ध केला.

Email - husashivaji@yahoo.com



ISSN 2231-573X
UGC Care Listed Journal

# तिफण

वर्ष : ११ वे अंक : १ ला
एप्रिल, मे, जून २०२०

## समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

Scanned by CamScanner

साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

वर्ष अकरावे अंक पहिला एप्रिल-मे-जून २०२०

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X

– संपादक –
**डॉ. शिवाजी हुसे**
मराठी विभाग प्रमुख
शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद

UGC CARE Listed Journal
ISSN 2231 - 573X
साहित्य, कला आणि लोकसंस्कृतीला वाहिलेले त्रैमासिक

# तिफण

MAH MAR 34737/13 /1/2009-TC

## समकालीन कथा व व्यावहारिक मराठी विशेषांक

वर्ष – ११ वे, अंक पहिला
(एप्रिल–मे–जून २०२०)

अतिथी संपादक
डॉ. राजेंद्र थोरात, पुणे    डॉ. राहुल पाटील, नाशिक

मार्गदर्शक
डॉ. विजय भोसले
(प्राचार्य, शिवाजी महाविद्यालय, कन्नड, जि. औरंगाबाद)

संपादक मंडळ
डॉ. सर्जेराव जिगे
डॉ. फुला बागुल
डॉ. अनिल गर्जे
डॉ. ताहेर पठाण
डॉ. वंदना महाजन
डॉ. प्रकाश खेत्री
डॉ. संजय भालेराव
डॉ. ममता इंगोले
डॉ. वामन जाधव
डॉ. यशवंत सोनुने

मूल्यमापन समिती
डॉ. संजय नगरकर    डॉ. जया कदम
डॉ. सुभाष बागल    डॉ. संदीप सांगळे
डॉ. भास्कर ढोके

मूल्य : १०० रुपये

या अंकातील लेखकांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
या नियतकालिकास महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळातून अनुदान प्राप्त झाले आहे.
परंतु या नियतकालिकांत प्रसिद्ध झालेली मते मंडळास मान्य असतीलच असे नाही.

पत्ता : संपादक, तिफण, 'शिवार', श्रीराम कॉलनी, हिवरखेडा रोड, कन्नड,
जि. औरंगाबाद – ४३११०३, मोबा. ९४०४०००३९८

Scanned by CamScanner

# – अनुक्रमणिका –


१. मराठी कथा: संकल्पना व स्वरूप /
डॉ. नाना झगडे........................................ ९

२. मराठी कथेची वाटचाल /
डॉ. श्रीराम गडकर........................................ १९

३. कथेचे घटक व प्रकार /
डॉ. संजय शिंदे........................................ ३२

४. कथेचा आस्वाद हा आनंदानुभव /
डॉ. राजेंद्र थोरात........................................ ३९

५. विचारप्रवृत्त व अंतर्मुख करणारी कथा
'जेव्हा मी जात चोरली होती' /
डॉ. विजय बालघरे........................................ ४४

६. शेतकऱ्यांची व्यथा मांडणारी वास्तव कथा 'लाल चिखल' /
डॉ. विजय केसकर........................................ ५६

७. विचार आणि चिंतनाचा पाऊस : 'पाऊस आला मोठा' /
डॉ. वर्षा तोडमल ........................................ ६१

८. विद्रोहाला शक्ती व व्यापकता देणारी कथा – 'उठावण' /
डॉ. महादेव कांबळे........................................ ६७

९. प्रस्थापित व्यवस्थेला इशारा देणारी कथा – 'उठावण' /
डॉ. प्रवीण ताटे – देशमुख........................................ ७२

१०. आदिवासींच्या व्यथा, वेदना व संघर्षाचे दर्शन : 'बाजा' /
डॉ. कैलास महाले ........................................ ८२

११. मुक्या सुरांचा 'बाजा' /
डॉ. हनुमंत भवारी ........................................ ९१

१२. वैद्यकीय पेशातील प्रवृत्तींवर प्रकाश टाकणारी कथा
'दगड दवाखाना' /
डॉ. राहुल जगदाळे ........................................ १००

१३. नातेसंबंधातील ताण-तणाव प्रदर्शित करणारी कथा 'वापसी' /
डॉ. प्रतिभा शंकर घाग-सोनी ........................ ११३

१४. प्रसंगनिष्ठ विनोदातून लोकप्रबोधन करणारी कथा
'शुभमंगल सावधान' /
डॉ. नानासाहेब पवार ........................ .......... ११८

१५. श्रमप्रतिष्ठा व ध्येयवाद जागवणारी कथा 'कष्टाची भाकरी' /
डॉ. हरेश संपत शेळके ........................................ १२८

१६. भाषिक कौशल्ये विकास /
डॉ. राजेंद्र रामकृष्ण सांगळे ........................................ १३२

१७. आकलनासह श्रवण कौशल्य /
डॉ. तुषार चांदवडकर ........................................ १४०

१८. संभाषण कौशल्याचे स्वरूप, महत्त्व
व सुधारणेसंदर्भातील उपाय /
डॉ. राहुल अशोक पाटील ........................................ १४४

१९. वाचन कौशल्य /
डॉ. संदीप रंगनाथ तापकीर ........................................ १५३

२०. लेखन कौशल्य
डॉ. कीर्ती मिलिंद मुळीक........................................ १६१

२१. ई- संवादाचे स्वरूप व विविध माध्यम /
डॉ. प्रकाश कारभारी शेवाळे ........................................ १६४

२२. सारांश लेखन /
डॉ. नितीन कल्याण मोरे ........................................ १७५

२३. सिन्नर महाविद्यालयात पदवीचे शिक्षण घेणाऱ्या
विद्यार्थ्यांचा वाचन भिरुचीचा अभ्यास /
डॉ. सुभाष बंडू अहिरे ........................................ १८३


Scanned by CamScanner

# १. मराठी कथा : संकल्पना व स्वरूप


– डॉ. नाना झगडे –

सहयोगी प्राध्यापक, वाघीरे महाविद्यालय, सासवड, पुणे

ई- मेल: zagdenana@gmail.com भ्रमणध्वनी: ९४२२६५२१९७


**प्रास्ताविक :**

कथा या वाङ्मयप्रकाराचे स्वरूप समजून घेताना आपल्याकडे गोष्ट रूपातून कथा कशी विकसित होत गेली हे थोडक्यात समजून घेतले पाहिजे. माणूस हा मुळातच गोष्टीवेल्हाळ व गोष्टीप्रिय आहे. तो बालपणापासून गोष्ट ऐकत आला आहे. गोष्ट ही आपल्याकडे मौखिक परंपरेतून आली आहे. गोष्ट सांगणे आणि ऐकणे हे त्याच्या आवडीचा विषय आहे. मूल्यसंस्कार, मनोरंजन, करमणूक, विरंगुळा म्हणून गोष्ट सांगण्याची व ऐकण्याची माणसाची स्वाभाविक प्रवृत्ती आहे. लहान मुलाला झोपविण्यापूर्वी, त्याचे रडणे थांबविण्यासाठी किंवा त्याला भीती दाखविण्यासाठी कदाचित आईने त्याला गोष्ट सांगितली असावी. पूर्वी राजा- राणी, प्रधान यांच्या पदरी गोष्ट सांगणारे विशिष्ट दरबारी लोक असायचे. एखादा वृत्तांत, एखादी हकिगत चटकदार पद्धतीने सांगितली, तिच्यातील कथनकाला प्राधान्य दिले की, गोष्ट तयार होते. पारंपरिक कथेचा प्रारंभ 'आटपाट नगर होते...' किंवा 'एकदा काय झाले..?' अशा विधानांनी होत असे.

कथा सांगताना शेवटपर्यंत उत्कंठा वाढवीत नेणे हे चांगल्या कथाकाराचे लक्षण असते. रंजन करता – करता एखादा संस्कार करणे, मूल्य रूजविणे, तत्त्व बिंबविणे हा कथेचा हेतू असतो. कथेत कथनाला महत्त्व असते. कथेत गोष्ट असतेच, पण गोष्ट म्हणजे कथा नव्हे. कथा ही गोष्टीच्या पलीकडे जाते. ती खोलात जाते. एखादा विशिष्ट अनुभव का आला? याची उकल व विचार करते. कथेचा अवकाश गोष्टीपेक्षा मोठा असतो. कथन परंपरेतून आलेल्या गोष्टीरूपातून मराठी कथा विकसित होत गेली. कथेला भारतामध्ये एक परंपरा आहे. या परंपरेच्या खुणा लोकसाहित्यात सापडतात. मुद्रणपूर्व काळात मौखिक परंपरेने कथा दीर्घकाळ जतन केली आणि पुढे टिकवूनही ठेवली. एकमेकांना गोष्ट सांगणे, तीच गोष्ट ऐकून दुसऱ्याला सांगणे अशा पद्धतीने तोंडी स्वरूपात ही गोष्ट जतन केली जात होती. ती गोष्ट मौखिक पद्धतीने वाटचाल करीत होती. गोष्ट सांगणे किंवा ऐकणे हा मानवी स्वभाव आहे. गोष्ट सांगण्यामुळे व ऐकण्यामुळे आनंद होतो. महानुभाव साहित्यामध्ये चक्रधरस्वामींनी वेळोवेळी दिलेले दृष्टान्त – दृष्टांतपाठ या ग्रंथात संग्रहित आहेत. 'जात्यंध आणि हत्ती', 'कठियाचा दृष्टान्त' इ. दृष्टांतांतून त्यांचे कथा सांगण्याचे कौशल्य दिसते.



चक्रधरांनी धानाई नावाच्या एका लहान मुलीला कथा सांगितल्याचा उल्लेख आहे. उदा. 'साळ्यीचे घर' ही कथा. चिऊताई चिऊताई दार उघड ही कथा आपण सर्वांनी अनेकदा ऐकलेली आहे. ती मौखिक परंपरेतून पुढे आली. आधुनिक काळात 'करमणूक' (१८९०) मासिकातून आधुनिक मराठी कथेचा प्रवास सुरू झाला. इंग्रजी राजवट सुरू झाल्यावर मुद्रित स्वरूपात आलेल्या मराठी कथेचे स्वरूप भाषांतरीत, अनुकरणात्मक व अद्भुतरम्य असेच होते.

**कथेचे स्वरूप :**

मराठीतील पहिली गोष्ट कोणी, कोणाला, केव्हा सांगितली याची नोंद वाङ्मयाच्या इतिहासात सापडणे किंवा कुणीही शोधणे तसे कठीणच आहे. संस्कृतमध्ये अभिजात गद्य पद्यात्मक कथा वाङ्मय तयार होताना अथवा त्याहूनही आधीच प्रादेशिक लोकभाषांतून कथांची, गोष्टींची निर्मिती विपुल प्रमाणात होत असावी. सण- समारंभ- उत्सव, घरगुती प्रसंग, लहान मुलांचे हट्ट, राजा- राणींचे मनोरंजन, पती- पत्नीमधील मुग्ध शृंगार यासंदर्भात विविध गोष्टी सांगितल्या गेल्या असाव्यात. कथा, पुराणे, आख्याने, प्रवचने यातून काही कल्पित गोष्टी मनोरंजनासाठी सांगितल्या गेल्या असाव्यात. व्रत- वैकल्ये, धार्मिक उपचार यांच्यानिमित्तानेही शेकडो कहाण्या तयार झाल्या असाव्यात. चिऊ- काऊ, भूते- खेते- राक्षस यांच्या गोष्टी रंजन मूल्यांमुळे तुलनेने अधिक लोकप्रिय झालेल्या असाव्यात.

कथा ऐकण्याची आवड मानवाला अगदी निर्मितीपासून आहे. माणसाचे बालपणही कथा श्रवणाला आसावलेले असते. 'खाऊ' इतकीच मुलांना गोष्ट प्यारी असत. या गोष्टीच्या वेष्टनाआडून मुलांना 'ज्ञान' भरवणे ही क्रिया आपल्या समाजात पूर्वापार चालत आली आहे. 'पंचतंत्र' आणि 'हितोपदेश' ही त्यांची दोन मोठी उदाहरणे.' ग. दि. माडगूळकर यांनी कथेचा उद्देश स्पष्ट केला आहे. या उद्देशानेच कथेला मानवी जीवनात खूप महत्त्व आहे. म्हणूनच कथा सर्वांना हवीहवीशी वाटते. घरातली आजी बहुधा ते कथाकथनाचे काम करी, शिशु वयापासून कुमार वयापर्यंतची घरातली मुले हे तिचे लाडके श्रोते असत. काही गोष्टी नित्याच्या धर्माचाराचेच अंग होऊन राहिल्या होत्या. अलिकडे कुटुंबसंस्थाच नाहीशी झाल्यामुळे आजी हा अनुभवी कथाकथक मुलांच्या वाट्याला येईनासा झाला आहे.' आजच्या काळात विभक्त कुटुंबप्रणालीमध्ये आजी व तिची गोष्ट संपल्याची खंत ग. दि. माडगूळकरांनी व्यक्त केली आहे. कथा ही आपल्या बालपणापासून साथ देत असते. आपल्यावर संस्कार करीत असते. बालपणी आईने सांगितलेल्या चिऊ- काऊच्या गोष्टी आपल्याला अंगाई घालतात. पुढे आजीने सांगितलेल्या राजा- राणीच्या, पऱ्यांच्या, भूता- राक्षसांच्या, देवादिकांच्या गोष्टींनी आपले कल्पनाविश्व संपन्न होते. वय जसजसे वाढते तसतसे आपले मन पशु–




Scanned by CamScanner